bhavishyavani भविष्यवाणी

bhavishya ALLIANCE

भविष्य अलायन्सचे मासिक बातमीपत्रक जानेवारी २००९

अंतरंग –

- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील अंगणवाडी सेविका, सहायिका तसेच स्वयंसहायता गटाची देणी देण्याची पध्दत सुधारण्यासाठी नवीन सुरुवात.
- गर्ल्स गेनिंग ग्राउंड प्रकल्पातील प्रशिक्षकांचे अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याचे प्रशिक्षण संपन्न .
- संगणक सहाय्याने सुरु असलेला प्रौढ शिक्षण आणि आरोग्य जाणीव जागृती कार्यक्रम.
- हात धुणे प्रकल्पातील वर्तणूक बदल.
- वाचकांचा प्रतिसाद

## आजपर्यंत

### एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतील अंगणवाडी सेविका, सहायिका तसेच स्वयंसहायता गटाची देणी देण्याची पध्दत सुधारण्यासाठी नवीन सुरुवात:-

अंगणवाडी केंद्रात येणाऱ्या मुलांना देण्यात येणारे अन्न शिजवणे व त्याचा पुरवठा करण्याच्या प्रक्रियेमध्ये महाराष्ट्रात ७०,००० स्वयंसहायता गट सहभागी आहेत. हया स्वयंसहायता गट, सदस्यांना शासनाकडून (एकात्मिक बाल विकास **सेवा योजना**) त्यांच्या कामाचे पैसे दिले जातात परंतु सध्याच्या स्वयंसहायता गट, अंगणवाडी सेविका व सहायिका यांची देणी देण्याच्या पध्दतीमध्ये काही विशिष्ट कार्यपध्दतीमुळे (विशेषत: अनुदानाच्या पुरवठयामध्ये दिरंगाई) उशीर होतो असे लक्षात आले आहे. त्यामुळे पूरक पोषक आहार कार्यक्रमाच्या आणि अंगणवाडी केंद्राच्या सुरळीत अंमलबजावणीमध्ये अडथळे येतात. त्याशिवाय अनेक आदिवासी जिल्हे आणि तालुक्यात बँक लांब अंतरावर असल्यामुळे, बँकेतील कोणताही व्यवहार कठीण होऊन बसतो. कोणत्याही प्रकारच्या व्यवहारात एक दोन दिवसाची मजुरी बुडते. त्यामुळे ते अधिकच अव्यवहार्य होऊन बसते. अनेक पातळयांवर याबाबत बरेच प्रयत्न करण्यात आले परंतु त्यांना फारसे यश मिळाले नाही.



जि.अमरावती, चिखलदरा तालुक्यातील बोरात्याखेडा गावातील लोकांकडून फिनोचे श्री.हर्मनदीप आणि स्वांज संस्थेचे श्री.महादेव ,स्वयंसहायता गटाच्या देणी देण्याबाबतचे प्रश्न समजून घेताना.

हयावर उपाययोजना म्हणून भविष्य अलायन्सने फिनो(फायनॅन्शियल इन्फर्मेशन ॲण्ड नेटवर्क ऑपरेशन्स लिमिटेड) आणि आय.सी.डी.एस् (एकात्मिक बाल विकास सेवा योजना) यांना एकत्र आणले. बायोमेट्रिक स्मार्ट कार्डवर आधारित उपाययोजना – ज्या सहज उपलब्ध आहेत- त्याबाबतचे तांत्रिक कौशल्य देण्यासाठी, फिनो, आय.सी.डी. एस्ला मदत करेल. आय. एफ. एम्. आर. ट्रस्टने प्रकल्पाला सुरुवातीचे अनुदान देण्याची तयारी दाखवली आहे.

ही उपाययोजना वेळेतील दिरंगाई कमी करण्याच्या मार्गांमधील एक उपाय ठरु शकेल. त्यामुळे प्रत्येक पातळीवर पारदर्शकता येण्यास मदत मिळेल. ही उपाययोजना अत्यंत सुरक्षित असून अशिक्षित आणि कमी शिक्षित लोकांबरोबर काम करता येण्याजोगी असल्याने, ती स्वीकारता येण्यासारखी आहे. भारतातील विविध लोकवस्त्यांमध्ये व अनेक राज्यात याचे प्रयोग झालेले आहेत. ही उपाययोजना सुरुवातीला अमरावती जिल्हयातील मेळघाटमध्ये राबविण्याचा प्रस्ताव आहे. ती कशी राबवायची याबाबत फिनो आणि आय.सी.डी. एस् मध्ये विचारमंथन चालू आहे. त्यासाठी लागणारे अनुदान मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

## 'गर्ल्स गेनिंग ग्राऊंड' प्रकल्पातील प्रशिक्षकांचे अभ्यासक्रमातील दुसऱ्या टप्प्याचे प्रशिक्षण संपन्न



जी जी जी प्रकल्पातील प्रशिक्षकांचे दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण

युवा सेंटर, खारघर, नवी मुंबई येथे २ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी २००९ या दरम्यान, जी जी जी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. प्रकल्पाच्या आजपर्यंतच्या अंमलबजावणीकडे पुन्हा वळून बघण्यासही हया दहा दिवसांच्या प्रशिक्षणामुळे वेळ मिळाला.

अनेक गावांमध्ये मुलींनी व त्यांच्या पालकांनीही हया कार्यक्रमाकडे, आयुष्यातील अनेक गोष्टी शिकण्याची त्यांना मिळालेली संधी असे बघितले.

त्यामुळे मुलींच्या सहभागास उत्तेजन मिळाले. काही गावांत मुला-मुलींच्या पळून जाण्याच्या घटनांना या कार्यक्रमाशी जोडले गेले आणि त्याच्या परिणामाने सत्रे काही काळ बंद पडली. मुलींचे आपल्या कुटुंबासोबत जगण्यासाठी होणाऱ्या स्थलांतराचाही कार्यक्रमावर परिणाम झाला कारण जवळपास सर्वच तालुक्यात साधारणपणे १५% ते ४०% एवढे स्थलांतर आहे. संसाधन साहित्यावर चर्चा करतांना मुलींनी – थोडे लिखाण असलेली चित्रमय पुस्तके आवडल्याचे सांगितले. संसाधन संचात चित्रमय फ्लिपचार्टचा समावेश केल्याने उपयोग झाल्याचेही सांगितले.



स्नेहा संस्थेद्वारा प्रेरित किशोरवयीन मुलींच्या गटाची जी जी जी प्रकल्पांतर्गत हक्कांसंबंधित सत्रे, विक्रोळी पार्कसाईट, मुंबई येथे सुरु.

प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात आरोग्य आणि वैयक्तिक स्वच्छता, प्रजनन व बालकांचे आरोग्य, मुलांची वाढ आणि विकास, कुपोषण आणि संतुलित आहार आणि पोषण या गोष्टींवर भर देण्यात आला आहे.मिडीया मॅटर्सच्या सुश्री अंजू आणि सुश्री. सीमा हया प्रशिक्षण सत्रांच्या प्रेरक होत्या . हया दहा दिवसांच्या सत्रांमधून सहभागी कार्यकर्त्यांनी पुष्कळ माहिती मिळवली आणि प्रत्यक्ष काम करताना सत्रांमध्ये आणि संध्याकाळच्या चर्चांमधून मिळालेल्या माहितीची देवाणघेवाण केली.

### जी जी जी प्रकल्प, मोखाडा येथील प्रेरिका सुनंदा पवार हिने घेतलेला पुढाकार

बेरिस्ते गावातील तीन पाडयांतून – कलमपाडा, पाटीलपाडा आणि बरफपाडा- सुरु असलेल्या जी जी जी प्रशिक्षण कार्यक्रमात ३७ किशोरवयीन मुली सहभागी आहेत. हे पाडे मोखाडयाच्या आतल्या भागात येतात आणि अतिशय दुर्गम भागात मोडतात .त्यामुळे हया भागात शाळागळतीचे प्रमाण जास्त आहे . हया भागातील काही मुली अजिबात शाळेत गेलेल्या नाहीत. सुनंदा पवार हया प्रेरिकेने हाच प्रश्न , हया भागाच्या मागास राहण्याचे कारण म्हणून ओळखला होता . तिला गावासाठी हया प्रश्नावर काम करायचे होते पण मुलींना संघटित कसे करायचे, समजत नव्हते.

हया प्रकल्पाने सुनंदाला ती संधी मिळवून दिली, असे ती म्हणते. मुली व प्रेरिकांच्यात चांगली मैत्री वाढावी म्हणून सत्राला सुरुवात करण्यापूर्वी मुलींसोबत जाणीव जागृतीचे खेळ किंवा गाणी घ्यायची, मुलींना आपली कुपोषित भावंडे ओळखता येतील, त्यांचे वजन वाढवण्यासाठी काय करता येईल किंवा मुलींसाठी साक्षरता वर्ग चालविता येईल असे त्यांना त्यांच्या प्रशिक्षणात सांगण्यात आले होते.

प्रेरिकेने त्यानुसार ज्या मुली कधीच शाळेत गेलेल्या नाहीत किंवा शाळेतून गळती झालेल्या आहेत अशा११ मुलींचा गट बनवून त्यांचे साक्षरता वर्ग सुरु करण्याचे ठरविले. आता हया मुली आपले नाव लिहू लागल्या आहेत आणि हजेरीपत्रकावर आपली सही करु लागल्या आहेत. त्यामुळे हया मुलींचा एक महत्वाचा विकास झाला. तो म्हणजे हया मुली इतर शाळेत गेलेल्या किंवा लिहू वाचू शकत असलेल्या मुलींच्या बरोबर उभ्या राहू लागल्या.

-सुश्री.श्रध्दा, प्रोग्रॅम मॅनेजर, आरोहण, मोखाडा यांची नोंद

### संगणक सहाय्यित प्रौढ शिक्षण कार्यक्रमामध्ये आरोग्य आणि पोषण जाणीव जागृतीच्या घटकाचा समावेश

गाव / वस्तीतील माता बालकांची आरोग्य व पोषणाची सद्यस्थिती समजून घेण्यासाठी करण्यात आलेल्या बेसलाईन सर्व्हे आता पूर्ण झाला आहे. मिळालेल्या माहितीच्या पृथक्करणाचे काम सुरु आहे. आरोग्य आणि पोषणाबाबतचा अतिरिक्त अभ्यासक्रम गाव/वस्तीत सुरु झाला आहे.

### पेठ मधील साक्षरता कार्यक्रमात अशिक्षित किशोरवयीन मुलींनी दाखवलेली उत्सुकता



अभ्यासात गोडी न वाटल्याने, नाशिक जिल्हयातील पेठ तालुक्यातील पाटे गावच्या अनिताने पहिलीतच शाळा सोडून दिली. आता ती दहा वर्षाची आहे आणि ती आपल्या पालकांना शेतीकामात मदत करते. गेल्या तीन महिन्यापासून ती साक्षरता कार्यक्रमात सहभागी झाली आहे. छोटी छोटी वाक्ये तिला लिहिता येतात आणि छोटया पुस्तकातली वाक्ये वाचता येतात. हया केंद्रात साक्षरता वर्गांना येणाऱ्या १९ महिलांसोबत येणाऱ्या चार किशोरवयीन मुलींपैकी ती एक असून, त्या सर्वच प्रगती पथावर आहेत. तिने दाखवलेल्या उत्सुकतेमुळे आणि नियमित वर्गांना जात असल्यामुळे तिची आई खूप खूश झाली आहे. कारण तिची बहीण आश्रमशाळेत असून नववीत शिकते. तिचा भाऊही शाळेत जातो. तिची प्रेरिका संगीता हिला साक्षरता वर्ग चालवीत असल्याबद्दल अभिमान वाटतो. हया महिला व मुलींना संगणकाचे आकर्षण असल्याचे ती सांगते. मात्र वीजटंचाई हया भागातील प्रश्न आहे हेही ती मांडते.

### हात धुणे प्रकल्पातील वर्तणूक बदल:-

युनिसेफच्या, गावाची सूक्ष्मनियोजन प्रक्रिया, स्कूल्स इन डेव्हलपमेंट कार्यक्रम आणि दीपशिखा कार्यक्रमातच हात धुणे प्रकल्पातील (हिंदुस्तान युनिलिव्हरच्या लाईफबॉय स्वास्थ्य चेतना कार्यक्रमावर आधारित)नवीन वर्तणूक बदल मोहिमेचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. हा एकत्रित कार्यक्रम नंदुरबार जिल्हयामध्ये –विशेषत: नवापूर तालुक्यात सर्वप्रथम राबविण्यात येत आहे. नवापूर तालुक्याच्या ४० प्रशिक्षकांना युनिसेफमार्फत दिल्या जाणाऱ्या २१ दिवसांच्या प्रशिक्षणात हात धुणे मुद्दयाचा एक घटक म्हणून समावेश करण्यात आला आहे. नवापूर तालुक्यातील सर्व गावांमध्ये होणाऱ्या सूक्ष्म नियोजन प्रक्रियेमध्ये हात धुणे विषयाचा संदेश हया प्रक्रियेतून प्रशिक्षित झालेल्या प्रशिक्षकांनी पुढे पोहोचवावा अशी अपेक्षा आहे.

### वाचकांचा प्रतिसाद

चेतना संस्थेच्या सदिच्छा! नोव्हेंबर ०८ च्या अंकाबद्दल मनापासून धन्यवाद. पुष्कळ कालावधीनंतर मला हा अंक वाचायला मिळाला. त्याची रचना छान आहे आणि दस्तावेजीकरणही उत्तम आहे. भविष्य लॅब प्रक्रिया आणि त्यातील चर्चांची मला आठवण येते. मला चुकल्याचुकल्यासारखे वाटते. भविष्यची प्रगती बघून मला आनंद झाला आहे. अनेक उपाययोजनांनी कुपोषण कमी करण्यात भविष्यला यश मिळेल अशी मला आशा आहे. तुमच्या कामात तुम्हाला यश लाभो ही सदिच्छा . भविष्यच्या टीमला माझा नमस्कार सांगा.- *इला वखारिया, चेतना, अहमदाबाद*

माहितीपूर्ण बातमी पत्रकाबद्दल तुमचे अभिनंदन भविष्य अलायन्स काय करते आहे, याची चुणूक त्यातून दिसून येते . एक सूचना द्यावीशी वाटते -तुम्ही जेव्हा एखाद्या नवीन उपक्रमाबद्दल सांगता तेव्हा तुमच्या भागीदार संस्थेचे नावही त्यात नमूद केले तर ते उपयुक्त ठरेल.- *सुषमा शेंडे, स्नेहा*

बातमीपत्र अतिशय उत्तम बनविण्यात आले आहे. धन्यवाद !- *सुश्री. रमा अय्यर, ग्रीन केटल कन्सल्टिंग*

अंक खूप छान बनविण्यात आला आहे. जसजसा काळ पुढे जाईल तसतसे तुमचे प्रयत्न उंचावण्याचा प्रयत्न करा. भविष्यमधली गंमतीची आठवण येता चुकल्याचुकल्यासारखे वाटते. सर्वांना माझा नमस्कार सांगा . - *श्री.सी.व्ही.शर्मा, एक्स चीफ ऑफ ऑपरेशन्स् , भविष्य अलायन्स*

तुम्हाला जर कोणत्याही सूचना, प्रतिसाद किंवा सहभाग द्यायचा असेल तर संगीता दासमोहपात्र यांना लिहा:- sangeeta@bhavishyaalliance.org.in / sangeetadm@yahoo.com, भविष्य अलायन्स, प्लॉट नं.१३१, जे लेन, सागर विहार जवळ, वाशी,नवी मुंबई - ४०० ७०३.फोन: ९१-२२-२७८२३२०२ / २७८२१६५७ फॅक्स : ९१-२२–२७८२४६२९